# Lesson 10:

**नैय्या मोरी नीके नीके चालन लागी**
**आँधी मेघा ,कछु ना व्यापे चढ़े संत बड़ भागी**
**उथले रहत डर कछु नाहीं, नाही गहरे को संसा**
**उलट जाय तो, बाल न बाँका, वा रे अजब तमाशा**
**औसर लागे तो ,परबत बौझा  तोऊ ना लागे रे भारी**
**धन सतगुरु जी ने राह बतायी वा की रे में बलिहारी**
**कहे कबीरा जो, बिन सिर खेवे सो यह सुमति बखाने**
**या बहु हित की, अकथ कथा है बिरलै खेवट ही जाने  – कबीर**

**भाषांतर :** माझ्या जीवनाची ही नवका मंद गतीने डुलते आहे. तिला नाही वादळाची, विजांच्या कडकडाटाची किंवा कोसळणाऱ्या धारांची भिती. फक्त कृपेचा हात असलेले लोकच हिच्यात चढू शकतात. पाणी उथळ असो वा खोल ह्या नवका स्वरकांना कोणतीच भिती नाही. ही नाव उलटी जरी झाली तरी आमच्या केसाला ही धक्का नाही लागणार. काय चमत्कार आहे! सतगुरुच्या कृपेने मी पर्वत देखील उचलू शकतो. आपली बुद्धी बाजूला ठेऊनच ही नाव वल्हवता येते असं कबीर म्हणतो. असाच माणूस हे ज्ञानसंचित जाणून घेऊ शकतो. ही कथा खूप महत्वाची आहे पण सांगता येणार नाही हेच खरं!

**धर्माधर्मो सुखंदुःखं मानसानी न ते विभो ।**
**न कर्ताऽसि न भोक्ताऽसि मुक्त एवासि सर्वदा ॥  – अष्टावक्र मुनि**

**भाषांतर :** धर्म - अधर्म किंवा सुख आणि दुःख हे तुला स्पर्श करु शकत नाही. तू ना करता आहेस ना भोक्ता आहेस. तू सदैव मुक्त आहेस.

# Lesson 11:

**सुखियाँ सब संसार हैं, खायें और सोयें**
**दुखियाँ दास कबीर हैं, जागे और रोयें - कबीर**

**भाषांतर** : संसारातले सर्व खाऊन - पिऊन सुखी आहेत पण झोपलेले आहेत.
दास कबीर मात्र दुःखी आहे कारण तो जागा आहे.

**राह चलत जो गिरे ताको नहीं दोस**
**या कबीर बैठा रहे ता सिर करड़े कोस - कबीर**

**भाषांतर** : वाटेवर चालताना जर कोणी धडपडत असेल तर त्याला दोष देऊ नये.
जे हातावर - हात धरून घरी बसून राहत त्यांना मात्र खडसावून जाब विचारावा.

# Lesson 12:

**साँच बराबर तप नाही झूँठ बराबर पाप**
**ज्याके हिरदय में साँच हैं, ताके हिरदय हरि आप - कबीर**

**भाषांतर** : सत्य बोलणं ही तपश्चर्या आहे आणि असत्य पाप आहे. ज्याच्या हृदयात सत्य आहे त्याच्याच हृदयात हरी आहे.

**जब मैं था तब हरि नहीं, अब हरि हैं, मैं नाहीं ।**
**प्रेम गली अति सँकरी, तामें दो न समाही ॥  - कबीर**

**भाषांतर :** मी जिथे आहे तिथे हरी नाही जिथे हरी आहे तिथे मी नाही. ही प्रेमाची वाट इतकी लहान आहे, तिच्यात दोन सामवूच शकत नाही.

**मन ऐसा निर्मल भया जैसे गंगा नीर ।**
**पीछे पीछे हरि लागा, कहत कबीर कबीर ॥   - कबीर**

**भाषांतर :** तुमचे मन गंगेसमान निर्मळ झाले की हरी तुमच्या मागे येईल.